# ग्रामीण भागातील 73 ठिकाणचे पाणी नमुने दूषीत

## पाणी शुद्धीकरणाकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष

### 3199 नमुन्यांची तपासणी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 1 )** प्रत्येक ग्रामपंचायतीने गावाला शुद्ध पाणीपुरवठा करणे अपेक्षित असते. मात्र, ग्रामीण भागातील 14 तालुक्यांतून 73 ठिकाणचे पाणी दूषीत असल्याचे तपासणीत समोर आले आहे. यामुळे संबंधित ग्रामपंचायतींना पाणी नमुन्यात क्लोरीनचा 20 टक्क्यांपेक्षा कमी वापर केल्याचे निदर्शनास आले. क्लोरीनचा कमी वापर केल्याने हे पाणी पिण्यास अयोग्य ठरले आहे. संबंधित ग्रामपंचायतींनी पाणी शुद्धीकरणाकडे दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट झाले आहे, तर तपासणी केलेल्या 3 हजार 199 नमुन्यांपैकी ग्रामीण भागातील 73 जलस्त्रोतांचे पाणी दूषीत (3.01 टक्के) पाणी दूषित आढळले आहे.

जिल्हा परिषद आरोग्य विभाग जिल्ह्यातील जलस्त्रोतांची अणुजैविक तपासणी करते. या अंतर्गत प्रत्येक जलस्त्रोताचे दरमहा जलसुरक्षा रक्षकामार्फत नमुने गोळा करून ते तपासणीकरिता जिल्हा प्रयोगशाळेत पाठवले जातात. जल शुद्धीकरण करताना यात क्लोरीन वापराचे प्रमाण 33 टक्के अपेक्षित आहे. मात्र, 33 टक्क्यांपेक्षा कमी क्लोरीनचा वापर केल्यास ते पाणी शुद्धीकरण योग्य पद्धतीने केले जात नाही. असा निष्कर्ष काढण्यात येतो. जिल्हा प्रयोगशाळेत पाणी नमुन्यांची तपासणी केल्यानंतर दूषीत नमुन्यांबाबत आरोग्य विभागाला प्राप्त झालेल्या अहवालानुसार दूषीत पाण्याबाबत संबंधित ग्रामपंचायतींना आरोग्य विभागाकडून नोटीस बजावून तत्काळ पाणी शुद्धीकरण करून पाणी पुरवठा करण्याचे निर्देश आरोग्य विभागाकडून संबंधित पंचायत समितीमार्फत देण्यात आले आहेत. फेब्रुवारी 2025 च्या अहवालानुसार ग्रामीण भागातील 2 हजार 391 पाणी नमुन्याची तपासणी केली आहे. याशिवाय शहरी भागातील 808 असे मिळून 3 हजार 199 पाणी नमुने तपासले आहेत. यामध्ये ग्रामीण भागात 73 तर शहरी भागात 51 जलस्त्रोताचे पाणी पिण्यास अयोग्य असल्याचे समोर आले.

### ग्रामपंचायतींना दिले जाते कार्ड

ग्रामपंचायतींना लाल, पिवळे व हिरवे कार्ड पाणी वापरानुसार दिले जाते. एखाद्या गावातील 70 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त लोक दूषित पाणी पित असतील, तर अशा ग्रामपंचायतींना तीव्र जोखमीचे गाव समजले जाते. त्यांना जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडून रेड कार्ड दिले जाते. त्यात एकही ग्रामपंचायत नाही. 31 ते 60 टक्के नागरिक दूषित पाणी पित असतील, तर मध्यम जोखमीचे गाव मानले जाते. अशा ग्रामपंचायतींना पिवळे कार्ड दिले जाते. शून्य ते 30 टक्के दूषित असल्यास अशी गावे सौम्य जोखीम या गटात मोडतात. त्यांना हिरवे कार्ड दिले जाते.

ज्या ग्रामपंचायत क्षेत्रातील जलस्त्रोताचे पाणी नमूने दूषित आले, त्यांना नोटीस बजावून पाणी शुद्धीकरणाबाबत आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या जातात. याशिवाय तेथील पाण्याचे सुपर क्लोरीनेशन केले जाते. पुन्हा पाणी नमुने घेऊन पाणी पिण्यास योग्य असेल तर तसे कळविले जाते.

**डॉ. सुरेश आसोले, जिल्हा आरोग्य अधिकारी**

# अन्यथा मंत्र्यांना दौरा करणे कठीन करू- राजु शेट्टी

## मुंबईतील पिक विमा कंपन्यांनाही दिला इशारा




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 1 )** महायुतीने निवडणूक काळात शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते, त्या आश्वासनांचा आता काय झालं, असा सवाल राजू शेट्टी यांनी सरकारला विचारला आहे. पंधरा दिवसाच्या आत विम्याचे पैसे विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले नाही तर मुंबईतील त्यांच्या कार्पोरेट ऑफिसमध्ये आम्ही घुसल्याशिवाय राहणार नाही. तसेच सरकार जोपर्यंत शेतकऱ्यांना कर्जमुक्त करत नाही तोपर्यंत आम्ही त्यांनाही सोडणार नाही. राज्यातील मंत्र्यांना ग्रामीण भागात दौरे करणे मुश्किल करू असा इशारा त्यांनी दिला.

राज्यभर शेतकऱ्यांच्या विषयाला घेऊन लवकरच आंदोलन केले जाणार असून त्यासंदर्भात आज प्रहार प्रमुख बच्चू कडू यांची भेट घेतली, अशी माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी मंगळवारी (दि.1) अमरावतीत दिली.

सगळे राजकीय पक्ष लबाड आहेत, मतं घेण्यासाठी आणि निवडणुकीसाठी केवळ त्यांना शेतकरी पाहिजे.

निवडणुका संपल्यावर ते शेतकऱ्यांना विसरतात. अनेक सरकार आली आणि गेली मात्र आम्ही तरीही शेतकऱ्यांच्या बाजूने लढतो आहोत. पुढेही आमची लढाई कायम राहणार असून बच्चू कडू देखील आमच्यापैकीच एक आहे, असेही ते म्हणाले.

> सध्या महाराष्ट्रातला शेतकरी अत्यंत अडचणीत सापडला आहे. सोयाबीन शेतकऱ्यांचा वाटोळ झालं आहे. अर्थात त्याला केवळ सरकारचे धोरण जबाबदार आहे. सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी अन्यथा मंत्रांना गावात दौरा करता येणार नाही असा इशाराही स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून त्यांनी दिला. 31 मार्च उलटल्यावरही पीक विमा शेतकऱ्यांना मिळाला नाही. पंधरा दिवसात शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम त्यांच्या खात्यात मिळाली नाही तर मुंबईतील पिक विमा कंपन्यांच्या कार्पोरेट कार्यालयात स्वाभिमानी शेतकरी संघटना आंदोलन करेल असा इशाराही त्यांनी दिला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी प्रहार प्रमुख बच्चू कडू यांच्यासोबत एकत्र आंदोलन करणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

### सातबारा कोरा करण्याचे आश्वासन का दिले

देशामध्ये सर्वाधिक आत्महत्या महाराष्ट्रात होत आहेत. दररोज आठ शेतकरी आत्महत्या करत आहेत. याची लाज सरकारला असली पाहिजे. आणि असं असताना राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार हे कोल्हापूरला आले आणि त्यांनी सांगितलं की 31 मार्चपूर्वी शेतकऱ्यांनी कर्ज भरावे, कर्ज माफ होणार नाही. अजित पवार गेली अनेक वर्ष अर्थमंत्री राहिले आहेत. त्यांना राज्यातली आर्थिक स्थिती संपूर्णपणे माहित आहे. एकनाथ शिंदे सरकारमध्ये देखील ते अर्थमंत्री होते. मात्र तेव्हा त्यांना राज्यातील स्थिती माहीत नव्हती का, असा सवाल राजू शेट्टी यांनी उपस्थित करून निवडणूक काळात महायुतीतील तीनही घटक पक्षांनी सत्तेवर आल्यास शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू असं आश्वासन का दिल असा प्रश्न त्यांनी विचारला.

## नागपूरच्या महिलेचे सावंगा विठोबातून सोन्याचे दागिने चोरी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 1 ) -** सावंगा विठोबा येथे दर्शनासाठी आलेल्या महिलेचे 83 हजार 500 रुपये किमंतीचे सोन्याचे दागिने चोराने लंपास केले. या घटनेची तक्रार स्वाती म. सागांडे (31,रा. नागपूर) यांनी 31 मार्च रोजी चांदुररेल्वे पोलिस ठाण्यात नोंदविली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला.

**चांदुररेल्वे ठाण्यात गुन्हा दाखल**

सावंगा विठोबा येथे दर्शनासाठी सद्यास भाविकांची प्रचंड गर्दी आहे. अशातच नागपूर येथील रहिवासी स्वाती सागांडे या सावंगा विठोबा येथे दर्शनासाठी गेल्या होत्या. दरम्यान अज्ञात चोराने त्यांच्याजवळील चार ग्रॅमचे सोन्याचे झुमके, डायमंडचे कानातले, डोरले, लॉकेट, अंगुठी, नथ, पायल व जोडवे असा एकुण 83 हजार 500 रुपयांचा ऐवज चोरून नेला. त्यामुळे स्वाती सागांडे यांनी चांदुररेल्वे पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदविली.

# काळया बाजारात जाणारा रेशनचा तांदूळ पोलिसांनी पकडला

## अंजनगाव सुर्जी पोलीसांची धडाकेबाज कारवाई



> अंजनगाव सुर्जी पोलिसांनी रविवारी 19 क्विंटल 600 ग्राम तांदूळ एका वाहनातून जात असताना जप्त केला आहे त्याबाबतचे पत्र मिळाले आहे अन्न पुरवठा अधिकारी चौकशी करून तांदूळ शासकीय आहे काय असल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल
>
> **पुष्पा सोळंके ( डाबेराव )**
> **तहसीलदार अंजनगाव सुर्जी**

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि. 1 )-** अंजनगाव सुर्जी येथून परतवाडा येथे रेशनचा 19 क्विंटल 600 ग्राम तांदूळ काळया बाजारात जात असताना पोलिसांनी नाकाबंदी करून तांदुळसह ट्रक पकडुन जप्त केला. याप्रकरणी अंजनगाव सुर्जी पोलिसात दोघांन विरुद्ध गून्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आय पी एस प्रशांत दगळे ठाणेदार अंजनगाव सुर्जी यांना दि. 30 मार्च रोजी सकाळी 8 वाजता गोपनीय माहिती मिळाली की, अंजनगाव सुर्जी येथून परतवाडा येथे राशनचा तांदूळ काळा बाजारात जात असल्याची माहिती मिळाली. त्यावरून अंजनगाव नविन बस स्थानक अग्रेसर चौक येथे नाकाबंदी करून ट्रक क्रमांक एमएच 48 टी 5492 पकडून पाहणी केली असता त्यामध्ये तांदूळ मिळून आला. ट्रकमध्ये 19 क्विंटल 600 ग्राम रेशनचे तांदूळा सह वाहन जप्त करण्यात आले. ट्रॅक चालक मोहम्मद शब्बीर गुलाम दस्तगीर रा.बुधवारा अंजनगाव सुर्जी मोहम्मद उमर अब्दुल सलाम अशा दोन जणांविरुद्ध अंजनगाव सुर्जी पोलिसात गुन्हा नोंद करून कारवाई केली आहे. हा मुद्देमाल अंजनगाव सुर्जी येथील शासकीय गोडाऊन मध्ये जमा केला आहे.

ही कारवाई आय पी एस प्रशांत दगळे ठाणेदार अंजनगाव सुर्जी यांच्या मार्गदर्शनाखाली अंजनगाव सुर्जी पोलिसांनी केली आहे.

# विभागीय लोकशाही दिन 15 एप्रिलला

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 1 ) -** विभागीय लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या दुसर्या सोमवारी आयोजित करण्यात येतो.मात्र, एप्रिल महिन्याच्या दुसर्या सोमवारी दि. 14 एप्रिल रोजी शासकीय सुट्टी असल्यामुळे त्यानंतरचा येणारा कामकाजाचा दिवस मंगळवार, दि. 15 एप्रिल रोजी, सकाळी 11 वाजता विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिनाचे आयोजन विभागीय आयुक्त कार्यालयात करण्यात आले आहे.

विभागीय लोकशाही दिनासाठी यापूर्वी प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्यात येईल. लोकशाही दिनात तक्रार नोंदविण्यासाठी नागरिकांनी तसेच महिलांनी त्यांचे तक्रार अर्ज (तालुका, जिल्हा किंवा महापालिका लोकशाही दिनानंतर) विहित नमुन्यात 15 दिवस अगोदर दोन प्रतीत पाठविणे आवश्यक आहे. नागरिकांनी तक्रार अर्ज dcgamravati@gmail.com किंवा dcg_amravati@rediffmail.com या ई-मेलवर विहित नमुन्यात पाठविण्याचे आवाहन आयुक्तालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

## सावंगा विठोबा येथे तरुणाचा हिसकला मोबाईल

**अमरावती** - चांदुररेल्वे पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सावंगा विठोबा येथे तीन अज्ञात आरोपींनी एका तरुणाचा सात हजार रुपये किमंतीचा मोबाईल हिसकाविला. या घटनेची तक्रार दिपक संजय घोडे (40, रा. सावरगड) यांनी 31 मार्च रोजी चांदुररेल्वे पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी तीन अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. या घटनेचा पुढिल तपास चांदूर रेल्वे पोलिस ठाण्याचे ठाणेदाराच्या मार्गदर्शनात पोलिस कर्मचारी करीत आहे.

# बस प्रवासात मोबाईल क्रमांक घेऊन महिलेचा विनयभंग

## आरोपीविरुध्द गाडगेनगर ठाण्यात गुन्हा दाखल



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 1 ) -** बस प्रवासात एका तरुणाने महिलेसोबत जवळीक साधून तिचा मोबाईल क्रमांक घेतला आणि त्यानंतर तिला कॉल करून त्रास दिला. इतकेच नव्हे तर त्याने महिलेचा हात पकडून तिचा विनयभंग केला. या घटनेची तक्रार पिडित महिलेने 31 मार्च रोजी गाडगेनगर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी सागर नामक आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

पिडितेच्या तक्रारीनुसार, 14 मार्च रोजी अमरावती शहरात राहणारी एक महिला ही बसमधून जात असताना, तिची सागर नामक तरुणाशी ओळख झाली. त्यावेळी त्याने महिलेशी जवळीक साधून तिचा मोबाईल क्रमांक घेतला. त्यानंतर त्याने महिलेला कॉल केला, परंतू तीने बोलण्यास नकार दिला. त्यावेळी सागरने तुझ्याशी लग्न करायचे आहे, असे महिलेला म्हटले. परंतू महिलेने त्याला सांगितले की, माझे लग्न झाले आहे. तरीसुध्दा सागर हा महिलेला कॉल करीत होता. दरम्यान महिला ऑटोमधून जात असताना, सागर सुध्दा ऑटोत बसला, त्यामुळे महिला खाली उतरली. त्यामुळे सागरहही खाली उतरला व त्याने महिलेचा हात पकडला. त्यामुळे महिलेला लाजीरवाणे वाटले. त्यामुळे महिलेने सागरला ढकलले व ती दुर झाली. त्यावेळी सागगरने महिलेला धमकी दिली. हा प्रकार पाहून महिलेने 31 मार्च रोजी सायंकाळी गाडगेनगर पोलिस ठाणे गाठून सागर नामक आरोपीविरुध्द तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला.

# भंगार बसेस बंद पडण्याची मालिका सुरुच

## वाहतुकीला अडथळा कायम



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर ( दि. 1 ) -** गेल्या अनेक महिन्यापासून दर्यापूर आगारातीलच नव्हे तर संपूर्ण जिल्हाभरात भंगार बसमुळे प्रवाशांच्या गैरसोयी मोठ्या प्रमाणात होत आहेत. एक दिवस अगोदर तरुण उत्सव मंडळ समोर लालपरी मध्ये तांत्रिक बिघाड आल्याने. रस्त्याच्या मधातच बस बंद पडली. तर आज दर्यापूर शहराच्या मुख्य वर्दळीच्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे बंद पडल्याने. वाहतुकीला मोठ्या प्रमाणावर अडथळा निर्माण झाला होता.

मानवी जीवन गतिमान झाले असून. अति महत्त्वाच्या ठिकाणी प्रवासाला निघतांना प्रवाशांचे अतोनात हाल होत आहेत. शाळकरी विद्यार्थी, वयोवृद्ध नागरिक व शिकवणी वर्गाला ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात मनस्ताप आहे. मानवी सेवा सुविधा मोठ्या प्रमाणात वाढल्या असून. प्रत्येक क्षेत्रात अद्यावत प्रणाली ही देशभरात विकसित झाली आहे. परंतु महामंडळाची लालपरी ही शेवटच्या घटका मोजताना दिसत आहे. दर्यापूर आगारातून अनेक भंगार बसेस व नादुरुस्त बसेस ह्या रस्त्यावर धावत आहेत. कुठे बंद पडेल याचा अंदाज राहिला नाही. दर्यापूर शहरात अगोदरच वाहतुकीची वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढली असता. रस्ते अरुंद झाले असल्याने मोटरसायकल धारकांना व खासगी वाहनधारकांना मोठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यात शहराच्या कुठल्याही मुख्य रस्त्यावर लालपरी ही दम सोडत असल्याने प्रवाशांसह वाहन चालकांना व वाहकांना सुद्धा मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. तरीसुद्धा महामंडळाचे अद्यापही लक्ष या मुख्य बाबीकडे केंद्रीत झाले नसल्याने. लाल परीचे अतोनात हाल होत आहेत. दर्यापूर आगाराला नवीन बसचा पुरवठा केव्हा होणार ? याकडे आता चालकांचे व वाहकांचे सुद्धा लक्ष लागले आहे.

# पतीला मारहाण करून पत्नीचे मंगळसूत्र हिसकले

## लोणी ठाण्यात दोन इसमांविरुध्द गुन्हा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 1 ) -** दुचाकीने जाणार्या दाम्पत्याना रस्त्यात अडवून दोन इसमांनी पतीला मारहाण केली आणि पत्नीच्या गळ्यातील 16 हजार रुपये किमंतीचे सोन्याचे डोरले जबरीने हिसकावून घेतले. या घटनेची तक्रार चित्रा सिध्दार्थ मस्के (21, रा. ब्राम्हणगाव, ता.पुसद, जि. यवतमाळ) यांनी 31 मार्च रोजी लोणी पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी दोन इसमांविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

पोलिस तक्रारीनुसार, चित्रा मस्के 30 मार्च रोजी रात्री आपल्या पतीसोबत दुचाकीने बडनेरावरून धानोरा फर्शी येथे जात होत्या. दरम्यान लोणी गावाजवळील मोरगाव फाट्यावर दोन अज्ञात इसमांनी त्यांची दुचाकी आडवी लावून मस्के दाम्पत्यांना रस्त्यातच अडविले. दरम्यान त्या इसमांनी चित्रा मस्केंचे पती सिध्दार्थ यांना मारहाण केली आणि त्यानंतर चित्रा यांच्या गळ्यातील सोन्याचे 2 ग्रॅमचे सोन्याचे डोरले बळजबरीने हिसकावून घेतले. मस्के दाम्पत्यांनी आरडाओरड करून मदतीसाठी नागरिकांना आवाज दिला. परंतू लुटारूंनी दुचाकीने पलायन केले. या घटनेची तक्रार चित्रा मस्के यांनी 31 मार्च रोजी लोणी पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी दोन इसमांविरुध्द गुन्हा नोंदविला. लोणी पोलिस आरोपींचा शोध घेत आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# अनियमित पाणी पुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त

## काँग्रेसची जीवन प्राधिकरण कार्यालयावर धडक | पाणी प्रश्न सुटला नाही तर पालकमंत्र्यांना घेराव घालणार





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 1)** - सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू आहे.शहरातील संपूर्ण नागरिक उन्हाने त्रस्त आहेत. त्यातच शहरात अनियमित पाणी पुरवठा होत असल्यामुळे याचा जाब विचारण्यासाठी मंगळवारी (दि.1) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यालयावर काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी धडक दिली. यावेळी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. पाणी पुरवठ्याचा प्रश्न तत्काळ निकाली काढण्यात आला नाही, तर जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांचा घेराव घालण्यात येईल, असा इशारा काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी दिला.

काँग्रेसचे शहराध्यक्ष बबलू शेखावत, माजी महापौर मिलिंद चिमोटे, विलास इंगोले, प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार, महिला काँग्रेसच्या अध्यक्ष जयश्री वानखडे यांच्या नेतृत्वात काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जीवन प्राधिकरणाच्या कार्यालयावर धडक दिली.

शहरातील बहुतांश भागात अनयिमित पाणी पुरवठ्यामुळे नागरिकांचे चांगलेच हाल सुरू आहेत. रात्री 11, 12 वाजता पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात आहे. जीवन प्राधिकरण कार्यालयात विचारणा केल्यावर प्रत्येक वेळी वेग-वेगळी कारणे देण्यात येतात. शहरात एक दिवस आड पाणीपुरवठा करण्यात येतो आहे. वारंवार तक्रार करून सुद्धा यावर कोणताच तोडगा काढण्यात आला नाही. मे महिन्यामध्ये तर पाण्यासाठी नागरिकांचे अतोनात हाल होणार आहेत. 25 वर्षांआधी जी परिस्थिती पिण्याच्या पाण्याची होती, ती आज आधुनिक काळात बहुतांश भागात दिसून येत आहे. निगरगट्ट सरकार सुद्धा झोपी गेले आहे, असा आरोप काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी यावेळी केला.

यावेळी प्रामुख्याने संजय वाघ, अशोक डोंगरे, मुन्ना राठोड, प्रदीप हीवसे, शोभा शिंदे, वंदना कंगाले, ज्योत्स्ना गुल्हाने, सलीम मीरावाले, रमेश राजोटे, गुड्डू हमीद, संजय बोबडे,गजानन जाधव, राजाभाऊ देशमुख, अतुल काळबेंडे, अभिजित गुल्हाने, अफझल पठाण, पंकज मेश्राम, अभिनंदन पेंढारी, अशोक डोंगरे, राजीव भेले, विकी उर्फ विशाल वानखडे, वैभव देशमुख, संजय बोबडे, प्रकाश पहूरकर, मुकेश छांगाणी, सचिन निकम, वंदना थोरात, बरकात अली, छोटू शाह, फैजान अली, अतुल देशमुख, गजानन राजगुरे, कलीम शाह, भैय्यासाहेब निचळ, विजय आठवले, शुभम बांबल, संकेत साहू, सुरेंद्र देशमुख,विकास धोटे, सुनील पडोळे, अरुण बनारसे, नाना बारबुद्धे, अजीम भाई, सुनंदा कोल्हे, उषा वानखडे, रोशनी कठाने, माया खोब्रागडे, निकोसे ताई, ललिता जनबंधू, सीमा राऊत, अनिता कोटांगळे, अन्नपूर्णा टेंभुर्णी, राखी वालदे, शीतल खराटे,श ीतल कोटांगळे, दमयंती कोटांगळे, उके ताई,सुवर्ण मोहोड, वरघाट ताई, विमल गाडे,ताईबाई इंगळे,मोहोड यांचेसह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

### जलवाहिन्या कमकुवत

शहराला जेवढ्या पाणीपुरवठ्याची गरज आहे तेवढे पाणी जीवन प्राधिकरणाला आणणे शक्य होत नाही. मोठ्या जलवाहिन्या कमकुवत झाल्या आहेत. या जलवाहिन्या फुटणे, गळती होणे हे प्रश्न निर्माण होत आहे, असे उत्तर अधिकाऱ्यांनी यावेळी दिले. नवीन जलवाहिन्यांचे काम पूर्ण का होत नाही, अशी विचारणा काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केली, तेव्हा ऑक्टोबर 2024 मध्ये वर्कऑर्डर दिल्यानंतर सुद्धा कंत्राटदार काम करीत नाही, असे उत्तर देण्यात आले. त्यावर अशा कंत्राटदारावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने केली. वीज पुरवठा वारंवार खंडित होत राहतो, त्यामुळे पाणीपुरवठा योग्य रित्या करणे शक्य होत नाही, असेही सांगण्यात आले. यावर काँग्रेसच्या शिष्टमंडळाने संताप व्यक्त केला. जिल्हा नियोजनाच्या बैठकीमध्ये सदर सर्व मुद्दे का पुढे करण्यात येत नाही? अशीही विचारणा करण्यात आली. शासन व प्रशासन यांचे आपसात कुठलेही नियोजन नसल्यामुळे जनतेला अत्यंत त्रास सहन करावा लागत असल्याचे काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

# पिंगळादेवी गडावर 13 व 14 एप्रिलला महाचंडिका यज्ञ

## चैत्र मासानिमित्त नवरात्र महोत्सवाला सुरुवात

## विविध धार्मीक कार्यक्रमांचे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,(दि.1)** - महाराष्टातील साडेतीन शक्तीपीठापैकी अर्धशक्ती पीठ असलेल्या पिंगळाई गडावर चैत्र मासानिमित्त नऊ दिवसीय नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. 6 एप्रिलला रामनवमीपासून देवीच्या दर्शनाकरिता भक्ताची अलोट गर्दी होणार आहे. यावर्षी विश्वस्त मंडळातर्फे चंडिका महायज्ञाचे आयोजन 13 व 14 एप्रिल रोजी करण्यात आले आहे. सोबतच हनुमान जयंतीला हनुमान चालीसा व सुंदरकांडही होणार आहे.

पिंगळादेवी गडावर चैत्र मासानिमित्त नवरात्र उत्सवाला सुरुवात झालेली असून विविध धार्मिक कार्यक्रम घेतल्या जातात. दररोज मंदिरामध्ये हरिपाठ, प्रार्थना, प्रवचने इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. परिसरातील अनेक गावातील सदभक्तांनी दररोज भजनी मंडळांनी भजनाचा कार्यक्रम मंदिरामध्ये ठेवण्यात आला आहे. दररोज महाप्रसाद सुद्धा भक्तांना वितरित करण्यात येत आहे. पिंगळादेवी ही जागृत देवी असून तिचे दर्शनीय रूप दिवसातून तीनदा बदलत असते. सकाळी बाल्यावस्था, दुपारी तरुणावस्था व संध्याकाळी वृद्धावस्थेत दिसत असल्याचा अनेक भाविकांचा भास होतो.

या देवीची एक आख्यायीका असून त्यामुळे परिसरातील भाविकांमध्ये देवी बद्दलचे महत्त्व अधिकच रूढ झाले आहे. गेल्या अनेक वर्षांपूर्वी मंदिरासमोर सभामंडप होता. तो मंडप निजामाने तोडून टाकला होता. तेव्हा देवीने त्याच्या स्वप्नात येऊन दृष्टांत दिला. त्यामुळे प्रभावित होऊन त्याने सभामंडप पुन्हा बांधून दिला. ती मुस्लिम वास्तू आजही कायम आहे. हैदराबादच्या निजामाला ही घटना माहीत होताच त्याच्या मनातही देवी बद्दल श्रद्धा निर्माण झाली. नवरात्रात मोठ्या प्रमाणात भाविक भक्तांची गर्दी असते. परंतु यावर्षी सुद्धा चैत्र मासानिमित्त मंदिरावर मारुडकर परिवार दाखल झाले असून ते 6 एप्रिल 2025 पासून मंदिरामध्ये नवरात्र उत्सवाची स्थापना करून दररोज देवीची पूजा करतील.

विश्वस्त मंडळाने यावर्षी पिंगळादेवीच्या दर्शनाकरिता येणार्या भाविक भक्ताची व्यवस्था केली असून मंदिरासमोर सभामंडप उभारण्यात आला आहे. गेल्या एक वर्षापासून पिंगळा देवीच्या मंदिराचे भव्य असे मंदिराचे काम चालू असून या कामाकरिता सदभक्तांनी सदर हाताने मदत करावी आणि देवीच्या दर्शनाचा चैत्र मासानिमित्त नवरात्र उत्सवात दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष विनीत पाखोडे, सचिव आशिष मारुडकर, विश्वस्थ पद्माकरराव पाखोडे, मोहन देशमुख यांनी केले आहे.

# महिलेला अश्लिल इशारे करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**अमरावती** - दर्यापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत महिलेला एका इसमाने अश्लिल इशारे करून, तिचा विनयभंग केला. या घटनेची तक्रार पिडित महिलेने 30 मार्च रोजी दर्यापूर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी विनोद विठ्ठल गवई याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.



**अमरावती-** अमरावती-स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते तथा माजी खासदार राजू शेट्टी मंगळवारी अमरावती दौऱ्यावर होते, दरम्यान त्यांनी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांची भेट घेतली. यावेळी बँकेच्या संचालक मंडळाकडून शेट्टी यांचा सत्कार करण्यात आला. बँकेचे उपाध्यक्ष अभिजीत ढेपे तथा इतर सदस्य यावेळी उपस्थित होते.

# कुऱ्हा बस स्टॉप येथे जलहिरा पाणपोईचे उद्घाटन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 1)** - कुर्हा येथील बसस्थानक परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून सतत प्रवाशांना व इतर नागरिकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अनुप जयस्वाल यांच्या वतीने केली जाते. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी गुढीपाडवा व हिंदू नविन वर्षाच्या शुभ मुहूर्तावर रविवारी (दि.30) सकाळी 11 वा. अनंत बजरंगप्रसाद जयस्वाल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जिशा जयस्वाल हीच्या हस्ते जलहिरा पाणपोईचे थाटात उद्घाटन करण्यात आले. उन्हाळ्याची चाहूल लागताच बस स्थानक परिसरात माठातील थंड गार पाण्याची सोय प्रवाशांना व गावकर्यांकरीता केली जाते. पाणपोई उद्घाटन कार्यक्रमाला वाहतूक नियंत्रक जयसेन इंगळे, अशोक,अनुप जयस्वाल,राजु दुधे, रवि बाहुले, सचिन सारवे, अंबादास उगवकार,रवि क्षिरसागर, राशद अली, गजानन लुटे प्रफुल्ल दारोकार, नितीन पवार, अंकुश इंगोले आदी उपस्थित होते.

# भारतीय महाविद्यालयात इंग्रजीच्या विद्यार्थ्यांसाठी संवाद सत्र

## तज्ञ प्राध्यापकांनी केले मार्गदर्शन | व्यावसायिक कौशल्यावर भर



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,(दि.1)** - मोर्शी येथील भारतीय महाविद्यालयात इंग्रजी विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी एक संवादात्मक सत्र नूकतेच आयोजित करण्यात आले होते. या सत्राचा उद्देश विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व व्यावसायिक कौशल्य विकसित करण्यासाठी तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन मिळवून देणे हा होता. या कार्यक्रमाला अमरावतीच्या शासकिय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्थेचे प्रा. डॉ. चौधरी, दर्यापूरच्या रामकृष्ण विद्यालयाचे गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. शितल तायडे, दर्यापूरच्या जे. डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालयाचे प्रा. होले आणि आर्वीचे प्रा. डॉ. अनुप गुमळे यांनी उपस्थित राहुण विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ.शीतल तायडे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना आश्वासन दिले की, संयुक्त कार्यशाळेचे आयोजन लवकरच केले जाईल, जेणेकरून त्यांना अधिक शैक्षणिक प्रशिक्षण मिळू शकेल. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष आगरकर, दर्यापूरच्या सांगळूदकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल बोडखे, इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुरेश बिजवे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. सवान देशमुख आणि इंग्रजी विभागाच्या प्राध्यापिका डॉ. दीपाली देशमुख यांनी सहभाग घेतला. या सत्रात करिअर संधी, साहित्य व संशोधनाच्या नव्या वाटा यावर महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांसाठी हे सत्र अत्यंत उपयुक्त ठरले. त्यांना शिक्षणतज्ज्ञांकडून मौल्यवान मार्गदर्शन मिळाले. तसेच भविष्यातील शैक्षणिक सहकार्याच्या नव्या संधींवर विचारमंथन झाले.

# पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकीत गुढी पाडवा उत्सव साजरा



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 1)** पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय अमरावती येथे गुढी पाडवा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा (दि.30)करण्यात आला. संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयश पोटे , प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया, सर्व विभाग प्रमुख व महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी यांनी एकत्र येऊन पारंपरिक पद्धतीने गुढी उभारत उत्सव साजरा केला. यावेळी, विद्यार्थ्यांना गुढी पाडव्यासंबंधीचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व सांगण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी एक छोटासा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला, ज्यात गुढी पाडवाच्या पारंपरिक गाण्यांवर नृत्य तसेच वाचनाचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया यांनी गुढी पाडवा उत्सवाच्या महत्त्वावर प्रकाश टाकताना, हा दिवस नवीन वर्षाच्या आरंभाची दर्शक असून आपल्याला सदैव सकारात्मक दृष्टिकोन ठेवून पुढे जाण्याची प्रेरणा देणारा आहे, असे सांगितले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीची जाणीव झाली आणि महाविद्यालयातील कुटुंबाचे एकत्र येण्याचे अद्वितीय अनुभव मिळाले. या गुढी पाडावा उत्सवाचे यशस्वी आयोजन एम.सी.ए. विभागाच्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी केले.

# गुणवंत विद्यार्थ्यांनी दिली आयआयटी बॉम्बे ला भेट

- व्हरटेक्स कोचिंग क्लासेसचा उपक्रम
- नवीन ज्ञान संपादनाची मिळाली संधी




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.1)** - विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, तंत्रज्ञानाची जाण आणि औद्योगिक तसेच सामाजिक ज्ञान वृद्धिंगत करण्यासाठी अमरावती आणि धामणगाव रेल्वे येथे शाखा असलेले व्हरटेक्स कोचिंग क्लासेस ही संस्था सातत्याने नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत असते. त्याचाच भाग म्हणून यंदा संस्थेतील इयत्ता 11 वी, 12 वी, जेईई आणि एमआचटी - सीईटी मधील 15 गुणवंत विद्यार्थ्यांसाठी आयआयटी बॉम्बे येथे चार दिवसीय मोफत अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याद्वारे विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळाली असून त्यांच्या ज्ञानात लक्षणीय भर पडली आहे.

या चार दिवसीय दौर्यात विद्यार्थ्यांना आयआयटी बॉम्बेच्या प्राध्यापक, तज्ञ आणि तेथील विद्यार्थ्यांशी सखोल संवाद साधण्याची संधी मिळाली. त्यांनी नवीन टेक्नॉलॉजी, रोबोटिक्स, नवीकरणीय ऊर्जा यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाविषयी माहिती घेतली. तसेच, आयआयटीतील प्रयोगशाळा आणि संशोधन केंद्रांना भेटी देऊन आपल्या अभ्यासाचे प्रत्यक्ष उपयोग पाहिले. या अनुभवाने विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन व्यापक झाला असून त्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

हा अभ्यास दौरा व्हरटेक्स कोचिंग क्लासेसच्या संचालिका नूतन ऋषिकेश शाहाकार-ठाकरे आणि उपसंचालक प्रा. हर्षद वानखडे यांच्या मार्गदर्शनात पार पडला. त्यांच्या नेतृत्वामुळे विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम अविस्मरणीय आणि ज्ञानवर्धक ठरला. संचालिका नूतन शाहाकार म्हणाल्या, आमचा उद्देश विद्यार्थ्यांना देशातील सर्वोत्तम शैक्षणिक संस्थांचा परिचय करून देणे आणि त्यांना मोठी स्वप्ने पाहण्यासाठी प्रोत्साहित करणे हा आहे. हा आयआयटी बॉम्बे दौरा त्याच दिशेने टाकलेले एक पाऊल आहे.

या दौर्यात 15 गुणवंत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. शैक्षणिक उत्कृष्टता आणि शिकण्याची आवड या निकषावर विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. त्यात रिद्धी लोखंडे, सिद्धी लोखंडे, संचिता शेंडे, रुपल मेटे, मैथिली मिरचापुरे, खुशबू यादव, ईश्वरी इंगळे, गायत्री देशमुख, साम्यक गजभिये, सुजल चव्हाण, आदित्य शेटे, अथर्व सात्रोटे, अनुप निखर, श्रेयश मेटे, शिवम शिरभाते यांचा समावेश होता.

### विद्यार्थ्यांचे अनुभव

या दौऱ्यात सहभागी झालेली विद्यार्थीनी रिद्धी लोखंडे हिने आपला अनुभव कथन करताना सांगितले, हा दौरा माझ्यासाठी एक डोळे उघडणारा अनुभव होता. आयआयटी बॉम्बेच्या तज्ञांशी संवाद साधून मला अभियांत्रिकी क्षेत्रात अधिक मेहनत करण्याची आणि माझी स्वप्ने साकार करण्याची प्रेरणा मिळाली. तसेच, उपसंचालक प्रा. हर्षद वानखडे म्हणाले, आम्ही फक्त शैक्षणिक यशच नव्हे, तर विज्ञान आणि तंत्रज्ञानाची सर्वांगीण समज निर्माण करण्यावर विश्वास ठेवतो. या दौऱ्याने विद्यार्थ्यांना त्यांचा अभ्यास आणि वास्तविक जग यांचा मेळ घालण्यास मदत केली.

### व्हरटेक्स क्लासेसची वैशिष्ट्ये

अमरावती आणि धामणगाव रेल्वे येथे शाखा असलेली व्हरटेक्स कोचिंग क्लासेस ही संस्था विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी ओळखली जाते. जेईई, नीट, आणि एमआचटी-सीईटीसारख्या स्पर्धा परीक्षांसाठी विशेष प्रशिक्षण देण्यासोबतच अशा अभ्यास दौऱ्यासारख्या उपक्रमांमुळे ही संस्था इतरांपेक्षा वेगळी ठरते. या अनुभवांमुळे विद्यार्थी केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता त्यापलीकडे जाऊन विचार करू लागतात.

### दौऱ्याचा प्रभाव

या चार दिवसीय आयआयटी बॉम्बे अभ्यास दौऱ्याने विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालण्यासोबतच त्यांचा आत्मविश्वासही वाढवला आहे. भविष्यात विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर करण्याच्या त्यांच्या महत्त्वाकांक्षेला या दौऱ्याने नवे बळ दिले आहे. व्हरटेक्स कोचिंग क्लासेसने अशा नावीन्यपूर्ण आणि परिणामकारक उपक्रमांद्वारे शिक्षण क्षेत्रात नवे मानदंड स्थापित केले आहेत.

# धामणगावात सुसाट धावली हास्यविनोदाची मिर्झा एक्सप्रेस

## डॉ. मिर्झा बेग यांनी श्रोत्यांना रिझविले





**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे,(दि.1)**- गुढीपाडवा निमित्त सांध्य दैनिक मतदार राजच्या वर्धापन दिन आणि एमआर न्यूज चॅनेलच्या उद्घाटन सोहळ्यात सुप्रसिद्ध हास्य कलाकार डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांच्या 'मिर्झा एक्सप्रेस' या विनोदी कार्यक्रमाने धामणगाव रेल्वेच्या श्रोत्यांना चांगलेच रिझविले.

कार्यक्रमाची सुरुवात श्रीहरी भक्त मंडळाच्या भजनांनी आणि द आर्टिस्ट म्युझिकल ग्रुप 'कराओके क्लब यांच्या सुमधुर गीतांनी झाली. सुरेश ठाकरे यांनी स्वागत गीत सादर केले. यानंतर बंजारा तांड्याच्या वसंत राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींनी मनमोहक बंजारा नृत्य सादर केले. यावेळी आमदार प्रताप अडसड यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून एमआर न्यूज चॅनेलचे उद्घाटन करण्यात आले. तसेच समाजसेवेत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल सुभाष कुचेरिया, सुरज मेश्राम, सचिन करडे, चेतन परडखे यांचा सत्कार करण्यात आला. हास्य-काव्य विनोदातील एक अग्रगण्य नाव असलेल्या डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांनी आपल्या खास शैलीत विनोदी कविता, किस्से आणि चुटकुल्यांनी उपस्थित प्रेक्षकांना मनमुराद हसवले. त्यांचा 'मिर्झा एक्सप्रेस' हा कार्यक्रम विनोद आणि सामाजिक संदेश यांचा सुरेख संगम होता. बेग यांनी आपल्या शब्दकलेच्या जोरावर हलक्या-फुलक्या विनोदांतून सामाजिक प्रश्नांवर मार्मिक भाष्य केले.

त्यांच्या सादरीकरणामुळे उपस्थित हजारों नागरिक हसून-हसून लोटपोट झाले. संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन प्रशांत टांगले आणि निलेश मोहकर यांनी केले. हा कार्यक्रम अहिल्याबाई बहुउद्देशीय संस्था आणि दैनिक मतदार राज यांच्या संयुक्त विद्यमाने भागचंद नगर येथील स्व.दादाराव अडसड हॉलीबॉल मैदानावर पार पडला. या कार्यक्रमाला शहरातील रसिकांनी मोठी गर्दी केली होती.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सच्चिदानंद काळे (अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ), विनोद तलवारे (माजी नगरसेवक), गिरीश ताथोड (ठाणेदार, दत्तापूर), डॉ. रुपेश खडसे (विदर्भ अध्यक्ष,लहुजी शक्ती सेना), पंकज जाधव (जिल्हाध्यक्ष,लहुजी शक्ती सेना), उमेश भुजाडणे, विनोद तिरले (तालुका अध्यक्ष, लहुजी शक्ती सेना), सलमान आयशा फैयाज खान (मुख्य संपादक, विदर्भ टुडे न्यूज) तसेच पत्रकार व मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संतोष वाघमारे, हर्षदा प्रदीप घोम, आणि अतुल भुजाडणे यांनी विशेष परिश्रम घेतले.